# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः20.12.2024** **वारःशुक्रवार**

---

ठळक बातम्या,

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून प्राध्यापक राम शिंदे यांची निवड,

२. विकासाच्या वाटेवर महाराष्ट्र थांबणार नाही – मुख्यमंत्र्यांचा निर्धार,

३. कांद्याला योग्य भाव मिळत नसल्यामुळं नाशिकमध्ये कालही लिलाव बंद, वीस टक्के निर्यात शुल्क रद्द करण्याची राज्याची केंद्राकडे मागणी

आणि

४. महिलांच्या टी-ट्वेंटी मालिकेत भारताचा वेस्टइंडीजवर विजय

शिंदे निवड

महाराष्ट्र विधानपरिषदेचे एकोणीसावे सभापती म्हणून प्राध्यापक राम शिंदे यांची काल एकमताने निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे हे शिंदे यांना सभापतीच्या आसनापर्यंत सन्मानपूर्वक घेऊन गेले. विधानपरिषदेच्या सभापतीपदी विधानपरिषद सदस्य प्राध्यापक राम शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव सदस्य श्रीकांत भारतीय, उमा खापरे आणि शिवाजीराव गर्जे यांनी मांडला. त्याला सदस्य मनीषा कायंदे, सदस्य अमोल मिटकरी आणि सदस्य ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी अनुमोदन दिले. उपसभापती डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी शिंदे यांचा परिचय करून दिला.

फडणवीस

“जात जितकी राजकारण्यांच्या मनात आहे, तितकी जनतेच्या मनात नाही हे या निवडणुकीने दाखवून दिलं”, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेमध्ये केलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला त्यांनी उत्तर दिलं.
महाराष्ट्राच्या जनतेनं आमचं काम पाहिलं होतं, 5 वर्ष जाती-धर्माचा विचार न करता ‘सर्वजन हिताय सर्वजन सुखाय’ अशाप्रकारचं काम आपण केलं असल्यानं आम्ही सुरु केलेल्या योजना बंद होऊ देणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली...

कामकाज

नागपूर इथं सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाचं कामकाज उद्या शनिवार, 21 डिसेंबर 2024 पर्यंत चालणार असल्याचं निवेदन मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत केलं.

स्थगन प्रस्ताव

मुंबईत नुकत्याच झालेल्या बोट दुर्घटनेत 110 प्रवाशांपैकी 96 प्रवाशांना सुरक्षित वाचवण्यात आलं असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. नौदलाच्या डॉक्टरांनी आतापर्यंत 13 जणांना मृत घोषित केलं आहे. मृतांमध्ये नौदलाचे ३ आणि १० सामान्य नागरिकांचा समावेश असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं.

शिंदे

दरम्यान, “महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचं राज्य करतानाच विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे”, असं प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल विधानपरिषदेत केलं. राज्यपालांच्या अभिभाषणावरच्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. “गेल्या अडीच वर्षात राज्याच्या कायापालटाला सुरूवात झाली असून

आता आमचं एकत्रित मिशन महाराष्ट्र समृद्ध करण्याचं आहे. त्यासाठी आम्ही तिप्पट वेगानं महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ, महाराष्ट्र आता थांबणार नाही", अशी ग्वाही त्यांनी दिली. एकाही पात्र लाडक्या बहिणीच्या खात्यात जाणारे पैसे बंद होणार नाहीत, अशी ग्वाही त्यांनी सर्व महिलांना दिली.  यावेळी त्यांनी राज्याच्या आणि विदर्भाच्या विकासासाठी केलेल्या कामांचा आढावा घेतला.

पुणे विमानतळ

पुण्याच्या लोहगाव विमानतळाचं 'जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ', पुणे असं नामांतर करण्याचा शासकीय ठराव मंत्री शंभूराज देसाई यांनी काल विधानपरिषदेत मांडला. या ठरावाच्या माध्यमातून लोहगाव विमानतळाचं नामांतर करण्याची शिफारस केंद्र सरकारला करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

संसद

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानावरुन काल सलग दुसऱ्या दिवशी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ झाला. त्यामुळे दोन्ही संभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.
राज्यसभेत या आणि इतर विषयावरुन विरोधी पक्ष सदस्यांनी दिलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळले.
गोंधळ आणि घोषणा चालूच राहिल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

धनखड अविश्वास

दरम्यान उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांच्या विरोधात सभागृहात मांडण्यात आलेला अविश्वास ठराव उपाध्यक्ष हरिवंश यांनी काल फेटाळून लावला. धनखड पक्षपातीपणे काम करत असल्याचा आरोप करत विरोधी पक्षांनी त्यांच्या विरोधात अविश्वास ठराव मांडला होता. उपराष्ट्रपती धनखड यांची प्रतिष्ठा डागाळण्याच्या हेतूनं घाईनं केलेली ही कृती अयोग्य असून त्यामध्ये अनेक चुका असल्याचं हरिवंश यांनी ठराव फेटाळताना म्हटलं.

भाजपा निदर्शनं

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या समर्थनार्थ तसंच काँग्रेसनं बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान केल्याचा आरोप करत भाजप खासदारांनी काल संसदेच्या आवारात निदर्शनं केली. तर शहा यांनी माफी मागावी, अशी मागणी करत विरोधी पक्षांच्या खासदारांनी संसद परिसरात मोर्चा काढला. या निदर्शनांमध्ये कॉंग्रेस खासदार राहुल गांधी यांच्याकडून धक्काबुक्की होऊन भाजपाचे प्रताप सरंगी आणि मुकेश राजपूत हे दोन खासदार जखमी झाले. त्यांना तात्काळ उपचारांसाठी रुग्णालयात नेण्यात आलं. या
धक्काबुक्कीत आपल्यालाही इजा झाल्याचं कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं. या प्रकरणी भाजपा आणि काँग्रेसने परस्परांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

कांदा नाशिक

कांद्याचे दर घसरत असल्यानं नाशिक जिल्ह्यात काल सलग दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडले होते. सकाळी लिलाव सुरू होताच लासलगाव बाजार समितीत कांद्याला कमीत कमी 800 ते जास्तीत जास्त 2900 दर मिळाला. त्यामुळे शेतकरी संतप्त झाले आणि त्यांनी लिलाव बंद पाडले.

कांदा  निर्यात

केंद्र सरकारनं कांदा निर्यातीवर लावलेलं 20 टक्के शुल्क तातडीनं रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. श्रीलंका सरकारनं कांद्यावरील आयातशुल्क 20 टक्क्यांनी कमी करून अधिकाधिक कांदा आयातीचे प्रयत्न सुरू केले असल्यानं नाशिकसह राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांमध्ये निर्यात करता यावा, कांद्याला खर्चावर आधारित चांगला दर मिळावा, यासाठी केंद्र सरकारनं कांद्यावरील 20 टक्के निर्यातशुल्क तातडीनं रद्द करणं आवश्यक असल्याचं उपमुख्यमंत्री पवार यांनी गोयल यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

कांदालिलाव

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील कांदा लिलाव काल माथाडी कामगार संघटनेच्या संपामुळे बंद पडला. त्यामुळं हतबल झालेल्या शेतकऱ्यांनीही बाजार समितीच्या प्रवेश द्वाराजवळ ठिय्या आंदोलन करुन रोष व्यक्त केला. यावेळी बाजार समितीच्या वरिष्ठांनी मध्यस्थी करुन गुरुवारचा कांदा लिलाव रद्द करुन आज सकाळी नेहमीप्रमाणे होईल, असं सांगितलं. पण शेतकऱ्यांनी आज बाजार समितीत नवा माल आणू नये, असं आवाहन अडत व्यापाऱ्यांनी केलं आहे.

जलपरिषद

केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र आणि इंडियन सोसायटी फॉर हायड्रोलिक्सनं संयुक्तपणे आयोजित केलेल्या "हायड्रॉलिक्स, वॉटर रिसोर्सेस, रिव्हर आणि कोस्टल इंजिनिअरिंग – हायड्रो 2024 इंटरनॅशनल" या 29व्या आंतरराष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन जलशक्ती मंत्रालयाचे सी. आर. पाटील यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीनं झालं. या तीन दिवसीय परिषदेमध्ये हायड्रोलिक्स, जलस्त्रोत, नदी अभियांत्रिकी आणि किनारपट्टी व्यवस्थापनाशी संबंधित विविध विषयांवर आमंत्रितांची व्याख्याने, संशोधन निबंध सादरीकरण तसेच हवामान बदलामुळे निर्माण झालेल्या आव्हानांमध्ये शाश्वत विकास उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि पर्यावरणपूरक उपायांना पुढे नेण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

उद्घाटन

अखिल भारतीय साहित्य महामंडळ आणि सरहद, पुणेतर्फे दिल्ली इथं आयोजित करण्यात आलेल्या 98व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या https://abmssdelhi.org या संकेतस्थळाचं उद्घाटन माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते काल पुण्यात करण्यात आलं. दिल्लीत सुमारे 70 वर्षांनंतर होत असलेल्या मराठी साहित्य संमेलनासाठी शुभेच्छा देऊन हे संमेलन अभूतपूर्व ठरेल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

सर्व भाषा कवी संमेलन

आकाशवाणीच्या वतीनं भारतीय संविधानात समाविष्ट असणाऱ्या सर्व भाषांच्या कवींचं संमेलन काल नवी मुंबईत वाशी इथं प्रथमच आयोजित करण्यात आलं होतं. त्यामध्ये देशभरातील 23 कवी आणि अनुवादकांचा सहभाग होता. या कवि संमेलनाचं ध्वनीमुद्रित प्रसारण 25 जानेवारीला देशभरातील आकाशवाणीच्या केंद्रावरून स्थानिक भाषांमधून करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला मुंबई आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी, तसंच इतर विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

संघ

भौतिक प्रगतीबरोबरच नैतिक प्रगती झाल्यास येत्या 20 वर्षात भारत विश्वगुरूपदाला पोहोचलेला दिसेल, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांनी काल पुण्यात व्यक्त केला. भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे, राष्ट्रीय स्वयंसवेक संघाचं 100व्या वर्षात पदार्पण आणि सहजीवन व्याख्यानमालेची रौप्य महोत्सवाकडे वाटचाल यानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

क्रिकेट

महिलांच्या वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारतानं वेस्टइंडिजचा तिसऱ्या सामन्यात 60 धावांनी पराभव करत ही मालिका 2-1 अशी जिंकली. नवी मुंबईत झालेल्या या सामन्यात भारतीय महिलांनी टी-ट्वेंटीमधील आजवरची सर्वाधिक 217 धावसंख्या उभारली. स्मृती मंधनानं 77 तर रिचा घोषनं 54 धावा केल्या. रिचानं केवळ 18 चेंडूत पन्नास धावा काढून विक्रम केला, ती सामनावीर ठरली. उत्तरादाखल वेस्टइंडीज संघ 20 षटकात 9 बाद 157 धावाच करु शकला. स्मृती मंधनाला मालिकावीर पुरस्कार देण्यात आला. उभय संघांमध्ये पन्नास षटकांची मालिका परवा 22 तारखेपासून सुरु होत आहे.

हवामान

राज्यात काही ठिकाणी किमान तापमानात घट झाली आहे. येत्या 24 तासात विदर्भ वगळता अन्यत्र आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.